06 FEB 2024
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ भुयारी मार्गाचे काम मुदतीत पूर्ण करा

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश : भुयारी मार्गाचे भूमिपूजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडण्याकरिता बांधण्यात येत असलेल्या भुयारी मार्गामुळे विद्यार्थ्यांसह अन्य घटकांची सोय होणार आहे. भुयाराचे काम उत्तम पद्धतीने आणि मुदतीमध्ये पूर्ण करावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदारांना दिले.

शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्ग कामाच्या भूमीपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कोनशिलेचे अनावरण करून भूमीपूजन समारंभ करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थिती होती.



**कोल्हापूर : कोनशिलेचे अनावरण करताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुल-सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. व्ही. एम. पाटील आदी.**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विशेष प्रयत्नांमुळे या भुयारी मार्गाच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर झाला. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्राप्तही झाला आहे. त्यामधून या कामास प्रारंभ करण्यात आला. विद्यापीठाचा विस्तार काळानुसार पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंना होत आहे. भविष्यातही पूर्व बाजूला अनेक इमारती व संकुले निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे या दोन्ही बाजूंकडील विद्यार्थी, शिक्षक व अभ्यागत आदींची वर्दळ महामार्गावरुन वाढली होती. त्यातून अनेक छोटे-मोठे अपघात घडले. त्यामुळे या दोन्ही बाजू भुयारी मार्गाने जोडण्याची विद्यापीठाची मागणी होती. माझ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यास मान्यता देण्यात आली.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस.पी. कुंभार, कार्यकारी अभियंता एस.आर. पाटील, उपअभियंता हेमा जोशी, कनिष्ठ अभियंता पूजा देसाई, उपकुलसचिव रणजीत यादव, ठेकेदार राजू इनामदार, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभा सदस्य, बांधकाम सल्लागार समितीचे सदस्य, अभियांत्रिकी विभागाचे कर्मचारी, आदी उपस्थित होते.

06 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राध्यापकांच्या ७२ पदांच्या भरती प्रक्रियेला प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता; खेळाडूंच्या दैनिक भत्त्यामध्ये वाढ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील राज्य शासनाने मान्यता दिलेल्या प्राध्यापकांच्या एकूण ७२ पदांच्या भरतीची प्रक्रियेला प्रारंभ झाला. त्याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करण्यास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने आज मान्यता दिली.

राज्यातील विविध १५ अकृषी विद्यापीठे आणि शासनमान्य अभिमत विद्यापीठांमधील शिक्षक, शिक्षक समकक्ष अशी ६५९ पदांच्या भरतीला शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नोव्हेंबर २०२२ मध्ये मान्यता दिली. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाला एकूण ७२ पदांच्या भरतीसाठी मान्यता मिळाली. त्यामध्ये सहायक प्राध्यापक ६२ आणि सहयोगी प्राध्यापकांची १० पदे आहेत. भरतीसाठी मान्यता मिळालेल्या पदांच्या अधिविभागनिहाय बिंदूनामावली (रोस्टर) तयार करून त्याची तपासणीचा प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाने फेब्रुवारीमध्ये शासनाकडे पाठविला. त्याला गेल्या महिन्यात शासनाची अंतिम मान्यता मिळाली. त्यानंतर अर्जासह अन्य प्रक्रियेबाबतची जाहिरात प्रसिद्ध करण्यास व्यवस्थापन परिषदेने आज मान्यता दिली. विद्यापीठात प्राध्यापकांच्या मंजूर जागापैकी निम्म्याहून अधिक जागा रिक्त आहेत. त्यामुळे तासिका आणि कंत्राटी तत्त्वावर विद्यापीठाला प्राध्यापकांच्या नेमणुका कराव्या लागत आहेत. आता प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरू झाल्याने त्याबाबतचा प्रशासनावरील ताण कमी होवून शैक्षणिक कामकाजाला गती मिळणार आहे.



दरम्यान, क्रीडा स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडूंच्या दैनिक भत्त्यामध्ये वाढ करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. लॉ अभ्यासक्रमाच्या अपात्र विद्यार्थ्यांना बार कौन्सिलच्या निर्णयास अधीन राहून सम-विषममध्ये परीक्षा देण्यास मान्यता मिळाली. महाविद्यालय दर्जा तपासणीसाठीच्या समितीत व्यवस्थापन परिषदमधून नावे निर्देशित करण्यात आली. बी. कॉम बँकिंग आणि फायनान्स अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठाचा ६० वा वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आला.


अंतिम मान्यतेत अडकली प्राध्यापक भरती

शिवाजी विद्यापीठातील स्थिती : मंत्री चंद्रकांत पाटील यांनी लक्ष देण्याची मागणी

२६२ | १३९ | १२३ | ७२

- शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांची मंजूर पदे ------ २६२
- रिक्त असेलली पदे ------------------------ १३९
- सध्या कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांची संख्या ------- १२३
- भरती होणाऱ्या पदांची संख्या ------------------ ७२

### 'सकाळ' चे पाठबळ

■ 'या प्राध्यापक पद भरतीला मान्यता दिल्याबद्दल शासनाचे धन्यवाद मानतो. त्यासाठी शासनाकडे मी सातत्याने पाठपुरावा केला. त्याला पाठबळ देत 'सकाळ'ने भरतीचा प्रश्न सातत्याने मांडला. त्यामुळे विद्यापीठाचा एक मोठा प्रश्न सुटला असून त्याचे समाधान असल्याची प्रतिक्रिया व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर यांनी व्यक्त केली.

### तीन महिन्यांत प्रक्रिया पूर्ण व्हावी

■ उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नोव्हेंबर २०२२ मध्ये या भरतीला मान्यता दिली. पण, बिंदूनामावली तपासणी आणि मान्यतेमध्ये वर्ष उलटले. आता भरतीची प्रक्रिया पुढील तीन महिन्यांत विद्यापीठ प्रशासनाने पूर्ण करावी. जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षात हे सर्व प्राध्यापक रूजू होतील यादृष्टीने कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी विद्यापीठ वर्तुळातून होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2024
तरुण भारत

# विद्यापीठातील प्राध्यापक भरतीची जाहिरात काढण्यास मान्यता

■ शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेत निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ७२ हून अधिक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यास सरकारने मान्यता दिली आहे. या पदभरतीची जाहीरात काढण्यास मान्यता देण्यात आली. हा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

व्यवस्थापन परिषदेत क्रीडा स्पर्धेसाठी ८० ऐवजी १५० दैनिक भत्ता देण्यास मान्यता. विधीच्या अपात्र विद्यार्थ्यांना बार कौन्सिलच्या अधीन राहून सम-विषम पध्दतीने परीक्षा घेण्यास परवानगी देण्यात आली. व्यवस्थापन परिषदमधून नावे निर्देशित करण्यात आली. अधिसभेत येणारे प्रश्न व बजेट,ऑडिट रिपोर्टसाठी नावे निर्देशित केली गेली. तसेच बांधकाम समितीच्या शिफारसी, बोर्डिंग इन स्टाफ फॉर्मला मान्यता देण्यात आली. व्यवस्थापन परिषदेत ६० वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आले. बी. व्होक बँकिंग आणि फायनान्स शाखा सुरु करण्याची शिफारस करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, स्वागत परुळेकर, डॉ. आर. डी. ढमकले, सिध्दार्थ शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

## परुळेकर यांच्या पाठपुराव्याला यश

प्राध्यापक भरतीसाठी मान्यता द्यावी या मागणीचे निवेदन उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाला दिले होते. तसेच विद्यापीठ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या देखभाल व स्वच्छतेसाठी कमिटी नियुक्त करावी, असे परुळेकर यांनी पत्र दिले होते. त्याअनुषंगाने व्यवस्थापन परिषद सदस्यांचा कमिटीत समावेश करावा. त्यांनी लिखीत स्वरुपात नियमावली तयार करावी, याबाबत व्यवस्थापन परिषद बैठकीत चर्चा करून मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
0 6 FEB 2024 लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांच्या ७२ पदांना अखेर मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सहायक प्राध्यापकांच्या ७२ पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यास व्यवस्थापन परिषदेने सोमवारी मान्यता दिली. त्यामुळे ही पदे भरण्याचा मार्ग मोकळा झाला. राज्यातील इतर विद्यापीठांच्या सहायक प्राध्यापक भरतीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता दिली असताना शिवाजी विद्यापीठाच्या रिक्त ७२ पदांचा प्रस्ताव धूळखात पडला होता. या पदाला शासनाने मान्यता दिल्यानंतर जाहिरात प्रसिद्ध करण्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक होती. त्यानुसार सोमवारी झालेल्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विद्यापीठात पूर्णवेळ प्राध्यापकांची १२५ पदे रिक्त आहेत. त्यातील ७२ पदांचे रोस्टर तयार करून तो प्रस्ताव विद्यापीठाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे पाठविला होता. त्याला काही दिवसांपूर्वी (पान ८ वर)

## भरती प्रक्रिया पारदर्शक राबवा

२०१४ पासून पूर्णवेळ सहायक प्राध्यापक भरती झाली नसल्याने विद्यापीठातील हिंदी विभागासह अनेक विभागांत एकही पूर्णवेळ प्राध्यापक नाही. सर्व कारभार कंत्राटी प्राध्यापकांवर सुरु आहे. त्यामुळे या भरतीकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. आता भरती प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ती पारदर्शकपणे राबवण्याची मागणी इच्छुक उमेदवारांमधून होत आहे.

# प्राध्यापकांच्या ७२ पदांना मान्यता

(पान १ वरून) मान्यता देण्यात आली होती. विद्यापीठात २०१४ पासून पूर्णवेळ सहायक प्राध्यापक भरती झालेली नाही. त्यामुळे अनेक विभागांत कंत्राटी प्राध्यापकांवर ज्ञानदानाचे कार्य सुरू होते. विविध विभागांत पूर्णवेळ प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याने याचा अध्यापनावर परिणाम होत होता.

**असे आहे विद्यापीठातील चित्र**

मंजूर पदे- २६२, भरलेली पदे- १३७, रिक्त पदे- १२५, किती पदांना मान्यता- ७२.

**वार्षिक अहवाल मंजूर**

क्रीडा स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडूंच्या दैनिक भत्त्यामध्ये वाढ करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

लॉ अभ्यासक्रमाच्या अपात्र विद्यार्थ्यांना बार कौन्सिलच्या निर्णयास अधीन राहून सम-विषममध्ये परीक्षा देण्यास मान्यता मिळाली. बी. कॉम बँकिंग आणि फायनान्स अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठाचा ६० वा वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आला.

0 6 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांग कायद्याच्या अंमलबजावणीची गरज

## डॉ. प्रेरणा शर्मा; विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना डॉ. प्रेरणा शर्मा. सोबत प्रा. डॉ. जगन कराडे, प्रा. डॉ. प्रल्हाद माने आदी.**

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

दिव्यांगासंदर्भातील सामाजिक व वैद्यकीय प्रारूपे समजावून घेतली पाहिजेत. त्याचबरोबर दिव्यांग कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. प्रेरणा शर्मा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात यूसीजी स्किम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलिटीज व समाजशास्त्र अधिविभागाच्या संयुक्त विद्यमाने 'उच्च शिक्षणातील दिव्यांग व्यक्तीसमोरील संधी, आव्हाने' विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र झाले. यावेळी त्या बोलत होत्या.

डॉ. शर्मा यांनी उच्च शिक्षणातील दिव्यांगाच्या अडचणी व अडथळे यावर त्यांनी प्रकाशझोत टाकला. समाजशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते. समाजशास्त्र अधिविभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिमा पवार उपस्थित होत्या.

पहिल्या सत्रात डॉ. एम. एस. वासवाणी यांनी मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी मानव्यविद्या विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख उपस्थित होते. त्यांनी नवीन शैक्षणिक धोरण व दिव्यांगासाठी उच्च शिक्षणामध्ये कराव्या लागणाऱ्या सोयीसुविधा यावर भाष्य केले. डॉ. नमिता खोत यांनी अध्यक्षीय भाषण दिले.

यावेळी कोमल ओसवाल, आकाश ब्राम्हणे, डॉ. पूजा पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन पवन कांबळे, अक्षता बिराजदार यांनी केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठातून

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2024
लोकमत

# विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : यूसीजी स्किम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलीटीज् आणि शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभाग यांच्यावतीने 'उच्च शिक्षणातील दिव्यांगांसाठी संधी आणि आव्हाने' या विषयावर रामानुजन हॉलमध्ये एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र झाले. डॉ. प्रेरणा शर्मा प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

डॉ. शर्मा यांनी उच्च शिक्षणातील दिव्यांगांच्या अडचणी व अडथळे यावर प्रकाशझोत टाकला. समाजशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. प्रतिमा पवार उपस्थित होत्या.पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते डॉ. एम. एस. वासवाणी यांनी उच्चशिक्षण संस्थांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काय करायला हवे याची मांडणी केली. डॉ. अविनाश भाले उपस्थित होते. यावेळी समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख उपस्थित होते. भारतातील वेगवेगळ्या राज्यांतील २८ संशोधकांनी 'उच्च शिक्षणातील दिव्यांग व्यक्तीसमोरील संधी आणि आव्हाने'वर शोधनिबंध सादरीकरण केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2024
सकाळ

# दिव्यांगांसमोरील आव्हानांवर चर्चा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात यूसीजी स्किम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलीटीज् आणि समाजशास्त्र अधिविभागातर्फे 'उच्च शिक्षणातील दिव्यांग व्यक्तीसमोरील संधी आणि आव्हाने' या विषयावर रामानुजन हॉलमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र झाले. या चर्चासत्रास मुंबईतील डॉ. प्रेरणा शर्मा प्रमुख उपस्थित होत्या. त्यांनी दिव्यांगांच्या अडचणींवर विचार मांडले. सामाजिक, वैद्यकीय प्रारूपे त्यांनी समजावून सांगितली. समाजशास्त्र अधिविभागाच्या विभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, प्रा. डॉ. जगन कराडे, एम. एस. वासवाणी, अविनाश भाले, एम. एस. देशमुख, नमिता खोत यांनी मार्गदर्शन केले. विविध राज्यांतील २८ संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. यावेळी कोमल ओसवाल, प्रतिमा पवार, आकाश ब्राम्हणे उपस्थित होते. समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. पूजा पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. पवन कांबळे, अक्षता बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 FEB 2024
सकाळ

# 'दूरशिक्षण'चे परीक्षा अर्ज भरण्याचे प्रशिक्षण

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणच्या बी.ए.,बी.कॉम.,एम.ए. (मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम.,या अभ्यासक्रमाच्या मार्च- एप्रिलच्या पुनपरीक्षार्थी विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील अभ्यासकेंद्रांच्या समन्वयक, लेखनिकांना परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले.

परीक्षा अर्ज भरणे व त्या अनुषंगाने येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निरसन करण्यासाठी आयोजित या कार्यशाळेत परीक्षा अर्ज भरण्याबाबतचे प्रात्यक्षिक सादरीकरण संगणकचालक विकास मोहिते यांनी केले. एम.ए., एम. कॉम भाग एक, दोन, बी. ए.,बी. कॉम भाग एक ते तीन मधील जे विद्यार्थी सत्र एक, तीन, पाचमध्ये उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी सत्र दोन, चार, सहाचा परीक्षा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. जे विद्यार्थी सत्र एक, तीन, पाचमध्ये अनुत्तीर्ण झाले आहेत, त्यांना अनुत्तीर्ण परीक्षा अर्ज व संबधित अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा शुल्क भरावी लागणार आहे. अर्ज भरण्याची अंतिम मुदत बुधवार (ता. ७) पर्यंत असून विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरावेत, असे आवाहन समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. सूर्यकांत गायकवाड यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 FEB 2024
लोकमत

# दूरशिक्षण केंद्राच्या परीक्षा अर्जाबाबत कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षणाच्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम. या अभ्यासक्रमाच्या मार्च/एप्रिल २०२४ च्या रिपीटर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. यासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील अभ्यास केंद्रांच्या समन्वयक व लेखनिक यांचे परीक्षा फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेबाबत ऑनलाइन कार्यशाळा पार पडली. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

परीक्षा अर्ज भरणे, त्या अनुषंगाने येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निरसन विकास मोहिते यांनी केले. एम.ए./एम.कॉम भाग १ व २, बी.ए.,बी.कॉम भाग १, २ व ३ मधील जे विद्यार्थी सेमिस्टर १, ३ व ५ मध्ये उत्तीर्ण झाले आहेत त्यांनी सेमिस्टर २, ४ व ६ चा परीक्षा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही. सेमिस्टर १, ३, ५ मध्ये अनुत्तीर्ण झाले आहेत त्यांना अनुत्तीर्ण परीक्षा फॉर्म व संबंधित अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा फी भरावी लागेल. फॉर्म भरण्याची अंतिम तारीख ७ फेब्रुवारी असल्याने परीक्षा फॉर्म वेळेत भरावेत, असे आवाहन समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2024

पुढारी

# 'दूरशिक्षण' केंद्राच्या कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्राच्या परीक्षा अर्जाबाबतच्या ऑनलाईन कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणच्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम., अभ्यासक्रमाच्या मार्च-एप्रिल २०२४ च्या रिपीटर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरणे सुरू आहे. यासाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अभ्यासकेंद्रांच्या समन्वयक व लेखनिक यांची परीक्षा फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेबाबत ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. विकास मोहिते यांनी मार्गदर्शन केले. परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख ७ फेब्रुवारी आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म वेळेत भरावेत, असे आवाहन समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी केले आहे. समन्वयक डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सहा. प्राध्यापक डी. के. कमलाकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले.

# आवाजाच्या गुणवत्तेसाठी श्वासाचे व्यायाम करा

## तुषार भद्रे; 'व्हॉईस कल्चर'वर शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आवाज ही आपली ओळख असते. आवाजाच्या गुणवत्तेसाठी श्वासाचे व्यायाम करा, असे आवाहन उच्चारशास्त्र तज्ज्ञ तुषार भद्रे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सोमवारी 'व्हॉईस कल्चर' यां विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. याप्रसंगी ते बोलत होते. भद्रे म्हणाले, बोलणे हे कौशल्य आहे. परंतु, ते प्रयत्नपूर्वक अधिक प्रभावी आणि प्रवाही करता येते. बोलण्याचे गाणे करता आले पाहिजे. हृदयापासून हृदयापर्यंत संवाद साधता आला पाहिजे. बोलण्यासाठी श्वास महत्त्वाची भूमिका बजावतो. श्वास ही स्वरयंत्राची ऊर्जा आहे. यासाठी श्वासाचे व्यायाम करणे गरजेचे आहे. यावेळी श्वासाचे व्यायाम कसे करायचे, याचे प्रात्यक्षिकही त्यांनी करून दाखवले.

कार्यशाळेत व्हॉईस डिलिव्हर कसा करायचा, आवाजाची जातकुळी कशी ओळखायची, रियाज कसा करायचा यावर मार्गदर्शन करण्यात आले. , आवाजाची, जोपासना व आवाजाची भावनांशी जोड देणे याबद्दल त्यांनी विवेचन केले. सहभागींना एकत्र करून त्यांच्या आवाजामध्ये भद्रे यांनी सादरीकरण करून दाखवले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रसाद ठाकूर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन नूतन सूर्यवंशी यांनी केले. प्रा. शिरीष शितोळे, प्रा. प्रकाश कांबळे, शिवानी शिवदास, अक्षय जहागीरदार, विजय मगदूम, अश्विनी धुरी आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उपस्थितांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे आयोजित व्हॉईस कल्चर कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना उच्चारशास्त्र तज्ज्ञ तुषार भद्रे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी 'लियर'चे सादरीकरण करताना.

# कॅपिटल वन एकांकिका स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संगीत, नाट्यशास्त्र विभागाचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बेळगाव येथील कॅपिटल वन संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी जयंत पवार लिखित 'लियर' एकांकिकेचे सादरीकरण केले.

स्पर्धेत उत्कृष्ट पार्श्वसंगीताचे पारितोषिक एम. ए. नाट्यशास्त्र भाग-२ मधील सिद्धांत खांडेकरला मिळाले. स्त्री अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक नाट्यशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी ऋतुजा बडवेला मिळाले.

एकांकिकेचे दिग्दर्शन विभागाचे माजी विद्यार्थी प्रशांत नागावकर यांनी केले. विभागाचे शिक्षक युवराज केळुसकर, विकास कांबळे व राज पाटील यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख डॉ. निखिल भगत, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. संजय तोडकर, डॉ. राजश्री खटावकर आदींचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 FEB 2024
पुढारी

# आजअखेर ६०३ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आजअखेर ६०३ निकाल घोषित झाले आहेत. सोमवारी मास्टर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ आर्किटेक्चर (जनरल) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये झाल्या. दरम्यान, दि.५ रोजी मास्टर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ जर्नालिझम अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 FEB 2024

तरुण भारत

# रिपीटरच्या विद्यार्थ्यांनी ७ फेब्रुवारीपर्यंत परीक्षा अर्ज भरावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षणच्या बी. ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम. कॉम.या अभ्यासक्रमाच्या मार्च/एप्रिल २०२४ च्या रिपीटर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी ७ फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापी रिपीटरचा परीक्षा अर्ज भरला नाही, अशा विद्यार्थ्यांनी https: //sukapps.unishivaji.ac.in/stud:reg/ #/login या लिंक जावून अर्ज भरावा, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.